ePaper
मविआ'चं सरकार आल्यास 3 लाखांपर्यंत शेतकऱ्यांचं कर्ज माफ करणार": शरद पवार



|| वर्ष - 8 | अंक -119 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- ऋषभ पंतने ५ स्थानांनी घेतली झेप
- सक्सेनाने रणजी ट्रॉफीत घडवला इतिहास
- निवडणुकीत ट्रम्प विजयी
- योगी सरकारला न्यायालयाने फटकारलं

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 7 नोव्हेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन

# पाणी कमी पडू देणार नाही!

## वाकडमध्ये महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांची प्रचार सभा

**| मुंबई | महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड शहर हे वेगाने वाढणारे शहर आहे. या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून माझ्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात आपण शहरासाठी आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाणी दिले. आणि आता भामा आसखेड धरणातून १६० एमएलडी पाणी योजनेचे भूमिपूजन केले आहे. एवढ्या पाण्याने शहराची तहान भागणार नाही. त्यामुळे आपण वेगवेगळ्या धरणातून शहराला पाणी आणण्यासाठी उपाययोजना करू. मी या शहराला पाणी कमी पडू देणार नाही, असे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाकड येथील सभेत दिले.**



> पिंपरी चिंचवड शहराची प्रगती आपल्याला करायची आहे. शिक्षण, आरोग्य, पाणी आणि मूलभूत सुखसुविधा त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. भारतीय जनता पक्षाने माझ्यासारख्या कार्यकर्त्यावर आज चिंचवड विधानसभेची उमेदवारीची जबाबदारी दिली. मी निश्चितपणे या येणाऱ्या पुढील काळामध्ये चिंचवड विधानसभेचे उर्वरित प्रश्न मांडून आपला आवाज हा विधानसभेपर्यंत पोहचवेन अशी मी शाश्वती देतो. महाराष्ट्राला पुढे नेण्यासाठी आणि चिंचवड विधानसभेचा विकास करण्यासाठी महायुतीला मतदान करा.
>
> **– शंकर जगताप,** महायुतीचे उमेदवार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप – शिवसेना – राष्ट्रवादी काँग्रेस – आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा वाकड येथील कस्पटे वस्ती येथे पार पडली.

गुजरातचे माजी गृहमंत्री प्रदीपसिंह जडेजा, खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, आमदार उमा खापरे, आमदार अमित गोरखे, नवनगर प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, शिवसेनेचे उपनेते इरफान सय्यद, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपचे शहर कार्याध्यक्ष शत्रुघ्न काटे, आरपीआय महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा चंद्रकांता सोनकांबळे, शिवसेनेचे शहरप्रमुख नीलेश तरस, आरपीआयचे (आठवले) शहराध्यक्ष कुणाल व्हावळकर, माजी महापौर उषामाई ढोरे आदी उपस्थित होते.

### वाहतूक समस्या सुटणार : फडणवीस

चिंचवड विधानसभा मतदारसंघात वाहतूक कोंडीची समस्या मोठी आहे. ही समस्या सोडवण्यासाठी शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोचे काम सुरू केले आहे. मेट्रो आणि पीएमपीएलच्या माध्यमातून नागरिकांना पब्लिक ट्रान्सपोर्ट कसा सुरू करून देता येईल यासंदर्भात काम करत आहोत. मेट्रोचे जाळे आपण विणत आहोत. त्याचबरोबर ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी २० हजार कोटी रुपयांचे रिंगरोडचे काम सुरू होणार आहे. त्यामाध्यमातून लवकरच वाहतूक कोंडीची समस्या सुटणार आहे.



## चंद्रकांतदादा पाटील यांच्या बाईक रॅलीला

# बाणेरकरांचा महायुतीला अभूतपूर्व प्रतिसाद!

### फटाक्यांच्या आतिषबाजी आणि पुष्पवृष्टीने जागोजागी उत्साहात स्वागत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोथरूड विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटील यांच्या निवडणूक प्रचार्थ बाणेर-बालेवाडी भागात बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. बाणेरकरांकडून या रॅलीचे जंगी स्वागत करण्यात आले.**



विधानसभा निवडणुकीसाठी भाजपा महायुतीने चांगलीच आघाडी घेतलेली आहे. कोथरूड विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटील यांनी नागरिकांच्या आणि प्रथितयश व्यक्तींच्या घरोघरी भेटी घेऊन संपर्क अभियान राबविले आहे. त्यासोबतच आज भाजपा कोथरूड उत्तर मंडलच्या वतीने महायुतीचे उमेदवार चंद्रकांतदादा पाटील यांच्या प्रचारार्थ बाणेर-बालेवाडी भागात बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजप उत्तर उत्तर मंडलचे अध्यक्ष सचिन पाषाणकर, गणेश कळमकर, प्रल्हाद सायकर, नगरसेवक अमोल बालवडकर, नगरसेविका ज्योती कळमकर, स्वप्नाली सायकर, लहू बालवडकर, राहुल कोकाटे, रोहन कोकाटे, उमाताई गाडगीळ, अस्मिता करंदीकर यांच्या सह भाजपचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

#### बैलगाडीचे केले सारथ्य...

या रॅलीला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. ढोल-ताशाच्या गजरात, फटाक्यांच्या आतिषबाजीमध्ये आणि पुष्पवृष्टीने ठिकठिकाणी चंद्रकांतदादा पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले. तर अनेक चौकांमध्ये महिलांकडून औक्षण करुन आ. पाटील यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी आमदार पाटील यांनी बैलगाडीचेही सारथ्य करत, साऱ्यांचेच लक्ष्य वेधले.

#### ... अशी निघाली रॅली

मोझे कॉलेज, साई चौक, ममता चौक, दसरा चौक - बालेवाडी गावठाण, बालेवाडी- ग्रामदैवत भैरवनाथ मंदिर, बालेवाडी- भीमनगर, पाण्याची टाकी, लक्ष्मीमाता मंदिर, चाकणकर मळा, बालेवाडी फाटा, माधव बाग, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, बाणेर गावठाण, दत्तमंदिर, बाणेर गावठाण, राघुनाना चौक मुरकुटे गार्डन, युतिका सोसायटी - चांदेरे चौपाटी, अंजोर सोसायटी आदी मार्गे ही रॅली मार्गस्थ झाली. तर माजी नगरसेविका ज्योती कळमकर यांचे जनसंपर्क कार्यालय येथे रॅलीचा समारोप झाला.

# ... म्हणून मावळवासी सुनीलआण्णांसोबत!

### मिशन विधानसभा : कष्टकरी पंचायतीचे बाबा कांबळे यांचा पाठिंबा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोणावळा व मावळ तालुक्यामधील कष्टकऱ्यांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरून काम करणाऱ्या आमदार सुनील अण्णांच्या पाठीशी मावळ तालुक्यातील कष्टकरी समाज टपरी, पथारी, हातगाडी हा व्यवसाय करणारा सर्वसामान्य मतदार पूर्ण ताकतीने उभा राहणार असल्याचे कष्टकरी पंचायतीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाबा कांबळे यांनी सांगितले.**



तसेच कष्टकरी पंचायतीच्या वतीने व टपरी, हातगाडी, पथारी पंचायतीच्या वतीने मावळचे आमदार सुनील शेळके यांना पूर्ण पाठिंबा जाहीर करण्यात आला असून सर्व नागरिकांनी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहून त्यांना बहुमताने निवडून देण्यासाठी पुढील पंधरा दिवस काम करायचे असे आव्हान देखील त्यांनी लोणावळा येथे पत्रकार परिषदेत केले आहे. यावेळी लोणावळा टपरी, पथारी, हातगाडी पंचायत चे अध्यक्ष वसंतराव काळोखे पाटील, कार्याध्यक्ष रमेश म्हाळस्कर, मावळ तालुका अध्यक्ष गणेश चव्हाण, नवनिर्वाचित सदस्य पथविक्रेता समिती अशोक कदम, आकाश परदेशी, निर्मला पांगारे, सुजाता म्हाळसकर, मुस्कान शेख, लक्ष्मण दाभाडे सरदार, ताजुद्दीन शेख, गणेश काळडोके, महादेव जगताप यांच्यासह टपरीधारक पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### महायुती सरकारचे आम्हाला पाठबळ...

यावेळी बोलताना बाबा कांबळे म्हणाले, मागील अनेक वर्ष महाराष्ट्रामध्ये आम्ही कष्टकरी समाजाचे नेतृत्व करत शासनाकडे आमच्या मागण्या मांडत होतो. मात्र आजपर्यंत आमच्या मागण्या कोणी पूर्ण करत नव्हते. महायुती सरकारने आमची दखल घेतली व आदरणीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, दुसरे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कष्टकरी समाजाला न्याय देण्याची भूमिका घेतली. लोणावळा शहरामध्ये कष्टकरी टपरी, पथारी, हातगाडी या व्यवसायिकांना आमदार सुनील शेळके यांनी पाठबळ दिले.

## ग्रामस्थ म्हणतात... विकास केला म्हणून आम्ही दादांसोबत

# आमदार लांडगेंमुळे चिखलीचा कायापालट!

### मिशन विधानसभा: आपुलकीच्या गाठीभेटींना उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिखलीत संतपीठ, टाऊन हॉल विकसित केला. देहू-आळंदीला जोडणारा समांतर रस्ता, चिखली आकुर्डी 18 मीटरचा रस्ता विकसित होत आहे. यामुळे चिखली परिसराचा कायापालट होत असून, ही कामे भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्यामुळेच झाली आहेत. त्यामुळे आम्ही महेशदादांसोबत असल्याची ग्वाही चिखली, कुदळवाडीतील नागरिकांनी दिली.**




भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी- आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या आपुलकीच्या गाठीभेटींना चिखली, कुदळवाडीत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी ठिकठिकाणी आमदार लांडगे यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले.

यावेळी माजी महापौर राहुल जाधव, उपमहापौर शरद बो-हाडे यांच्यासह ग्रामस्थ महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते फेरीत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नेवाळे, मोरे, यादव, बालघरे, मळेकर, पवार, जाधव, व्यापारी, उत्तर भारतीय नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महिलांनी रांगोळ्या काढून स्वागत केले. चिखलीचे ग्रामदैवत भैरवनाथ महाराजांचे दर्शन घेऊन गाठीभेटींना सुरुवात झाली. हरघुडे वस्ती, नेवाळे वस्ती, कुदळवाडी परिसर फेरी काढली.

> पिंपरी-चिंचवड शहराला जलस्त्रोतांमध्ये आत्मनिर्भर करण्यासाठी आंद्रा, भामा आसखेडमधून २६८ एमएलडी पाणी आरक्षण मंजूर केले. या प्रकल्पातील १०० एमएलडी पाणी चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात दाखल झाले आहे. १६८ एमएलडी पाणी योजना प्रगतीपथावर आहे. जून- २०२५ मध्ये सदर पाणी शहरात दाखल होईल आणि समाविष्ट गावांचा आगामी २५ वर्षांचा पाणी प्रश्न सुटण्यास मदत होईल. तसेच, पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाचा जैसे थे आदेश रद्द केला असून, मुळशी धरणातून ७५० एमएलडी पाणी आरक्षणाचा प्रस्ताव राज्य सरकारला पाठवला आहे. त्यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत.
>
> **– महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

## आमदार अण्णा बनसोडे यांच्या जाहीरनाम्याचे लोकार्पण

### पिंपरीत महायुतीच्या रॅलीला प्रतिसाद; उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे ऑनलाईन प्रकाशन

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी मतदार संघातील महायुती राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे यांच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन बुधवारी दापोडी येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. यानंतर आमदार बनसोडे यांच्या प्रचारार्थ दापोडीत भव्य प्रचार फेरी काढण्यात आली.**



#### जाहीरनाम्यातील आश्वासने...

1. संपूर्ण मतदारसंघात मेट्रोचे जाळे, चाकण, तळवडे व हिंजवडी परिसर जोडणारा मेट्रो मार्ग उभारणे,
2. विधानसभा क्षेत्रातील सर्व झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन
3. वाढती लोकसंख्या विचारात घेऊन पाण्याचे नियोजन
4. वल्लभनगर एसटी स्टँड चा पुनर्विकास
5. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर थीम पार्क
6. शहरात अंडरवॉटर जागतिक दर्जाचे मत्स्यालय उभारणे
7. मतदार संघातील पाच रेल्वे स्टेशनचे सुशोभीकरण
8. अपंग निराधार वृद्ध यांच्यासाठी शहरांमध्ये होम स्टे
9. जनसंपर्क कार्यालयात २४/७ टोल फ्री कॉल सेंटरची उभारणी
10. पिंपरी येथे माता रमाई स्मारक
11. निगडी येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक पिंपरी गावात महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे स्मारक उभारणे
12. हाफकीन संस्थेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र घरकुल योजनेची उभारणी.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने व महायुतीच्या सर्व प्रमुख नेत्यांच्या उपस्थिती मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व पिंपरी विधानसभेचा जाहीरनामा ऑनलाइन पद्धतीने प्रकाशित करण्यात आला.

त्यानंतर पिंपरी विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व महायुतिचे अधिकृत उमेदवार आ. अण्णा बनसोडे यांच्या प्रचारार्थ फिरंगाई देवीचे दर्शन घेऊन दापोडी गावातून प्रचार फेरीला सुरुवात करण्यात आली. प्रचार फेरी सिद्धार्थ नगर, नरवीर तानाजी पुतळा, पवार वस्ती, एसएमएस कॉलनी, आतार वीटभट्टी, महाविहार, काचीवाडा, फुलेनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, खालची आळी विठ्ठल मंदिर,समर्थ व्यायाम शाळा, शिवम मित्र मंडळ, आझाद मित्र मंडळ, वरची आळी विठ्ठल मंदिर, ११ नंबर बस स्टॉप, मंत्री कॉम्प्लेक्स, सुंदर बाग, गणेश गार्डन या मार्गाने प्रचार फेरी काढण्यात आली.




# भूमिका

**जमिनी फ्रीहोल्ड करण्यासंदर्भातील ज्युलिओ रिबेरो यांचा 'बिल्डरांच्या फायद्यासाठी पुनर्विकास?' हा लेख (लोकसत्ता- १ नोव्हेंबर) वाचनात आला. या लेखात, काही गृहनिर्माण संस्थांमध्ये फ्रीहोल्डसाठी आवश्यक निधी आणितसेच यामुळे संस्थेच्या सदस्यांतील मतभिन्नतेवर भाष्य केले आहे. शेवटी त्यांनी असा निष्कर्ष काढला की, हे सर्व बिल्डर लॉबीसाठीच केले जात आहे.**

## सुरक्षिततेसाठी पुनर्विकास अपरिहार्य

परंतु रिबेरो यांना या प्रश्नामागची पूर्ण पार्श्वभूमी माहीत नसावी आणि त्यामुळे त्यांचा गैरसमज झाला असावा.मुंबई आणि महाराष्ट्रात सुमारे २२ हजार गृहनिर्माण संस्था आहेत, ज्या शासनाने प्रदान केलेल्या जमिनीवर स्थापन झालेल्या आहेत. वर्ग-१ म्हणजे फ्रीहोल्ड किंवा मालकीची जमीन (कोणताही बोजा नसलेली), तर वर्ग-२ जमिनींना शासनाच्या काही निर्बंधांचा सामना करावा लागतो. भाडेपट्टीच्या जमिनींसाठी वार्षिक भाडे द्यावे लागते. कब्जेहक्क वर्ग-२ आणि भाडेपट्टी तत्त्व इंग्रजांनी आणलेली जमीनदारी प्रणाली आहे. इंग्रज जाऊन ७५ वर्षे झाली, तरीही त्यांची प्रणाली आजही तशीच आहे.आयएएस आणि आयपीएस अधिकाऱ्यांना मुंबईत मोक्याच्या जागी जमिनी प्रदान केल्या गेल्या, तर सामान्य मध्यमवर्गीय नागरिकांना शहराच्या सीमेलगतच्या जमिनी दिल्या गेल्या.



मुंबईत जागेची कमतरता असल्याने उपनगरांतील अत्यंत गैरसोयीच्या जागा मध्यमवर्गीयांनी घेतल्या. त्यांना अक्षरशः खाडी क्षेत्रात प्लॉट्स दिले गेले. त्या क्षेत्रावर भराव टाकून आवश्यक पायाभूत सुविधा (उदाहरणार्थ रस्ते, पाणी, वीज) त्यांना स्वतःच उभाराव्या लागल्या. त्यांनी हे आव्हान स्वीकारले आणि पेललेदेखील. १९७० ते १९८० या काळात मध्यमवर्गीय नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपनगरांत घरे आणि इमारती बांधल्या. त्यावेळच्या निकृष्ट रेशनच्या सिमेंटने बांधलेल्या या इमारतींना आज ५० ते ६० वर्षे होत आहेत आणि त्या जीर्ण झाल्या आहेत. राहण्यास असुरक्षित ठरल्या आहेत. काही इमारतींना आता पुनर्विकासाची गरज आहे. कुर्ल्यातील नाईक नगर इमारत दोन वर्षांपूर्वी कोसळली आणि १९ जणांचे बळी गेले.या सर्व समस्यांवर विचार करत, आम्ही मध्यमवर्गीय गृहनिर्माण संस्थांनी एकत्र येऊन पुनर्विकासासाठी जमिनी फ्रीहोल्ड करणे आवश्यक आहे, या निष्कर्षाप्रत पोहोचलो. पुण्याच्या यशदा संस्थेने संकलित केलेल्या प्रशासकीय सुधारणांवर आधारित रत्नाकर गायकवाड आणि नितीन करीर यांच्या मार्गदर्शनाखाली एक अहवाल २००६ मध्ये तयार करण्यात आला, ज्यात प्रति चौरस फूट १ रुपया शुल्क आकारून जमिनी फ्रीहोल्ड करण्याची शिफारस केली होती. हा अहवाल सांगतो- '१९६७ पासून राज्यात हजारो हेक्टर कृषी जमिनी अकृषक जमिनीत रूपांतरित झाल्या आहेत, परंतु त्या अजूनही वर्ग-२ हक्कांतर्गत आहेत. कायद्यात बदल करून प्रति चौरस फूट १ रुपया शुल्क आकारून अशा जमिनी वर्ग-१ हक्कांतर्गत आणाव्यात, ज्यामुळे मोठे उत्पन्न मिळेल, कालबाह्य प्रणाली संपुष्टात येईल आणि जमिनीचे हक्क मुक्तपणे विक्रीसाठी उपलब्ध होतील.'आम्ही मध्यमवर्गीय नागरिकांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. प्रथम २०१६ साली कायद्यात बदल घडवून आणला आणि २०१९ साली त्याचे नियम निश्चित करून घेतले. गृहनिर्माण संस्थांसाठी फ्रीहोल्डचा १५ टक्के दर निश्चित करण्यात आला. हा दर आम्हाला परवडणारा नव्हता, म्हणून आम्ही तो ५ टक्के करावा असा आग्रह धरला. त्यासाठी आम्ही लोकप्रतिनिधींना भेटलो, विविध माध्यमांतून जनजागृती मोहिमा राबवल्या आणि शासनाशी सातत्याने संपर्क साधून आमचे प्रश्न मांडले. सरतेशेवटी, मार्च २०२४ मध्ये गृहनिर्माण संस्थांसाठी दोन प्रकारच्या फ्रीहोल्ड नियमांची घोषणा करण्यात आली. पहिल्या योजनेत 'आरआर'च्या पाच टक्के दराने फ्रीहोल्ड करता येऊ शकते, परंतु यासाठी कठोर अटी व शर्ती आहेत, ज्या पूर्ण करणे अवघड आहे. या योजनेत संस्थेला स्वतः पुनर्विकास करावा लागेल आणि २५ टक्के अतिरिक्त एफएसआय प्रधानमंत्री आवास योजनेसाठी राखून ठेवावा लागेल. दुसऱ्या योजनेत, 'आरआर'च्या १० टक्के दराने फ्रीहोल्ड करता येऊ शकते, ज्यात कोणत्याही अटी नाहीत. मात्र, १० टक्के दर हा गृहनिर्माण संस्थांसाठी अतिशय जास्त आहे, पण आता दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नाही.

## प्रासंगिक »

### ट्रम्प यांचा विजय

***अमेरिकन राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठा विजय मिळविला आहे. ट्रम्प यांचा विजय अनेक अर्थांनी भारत आणि इस्त्रायलच्या फायद्याचा आहे.***

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठा विजय मिळविला आहे. ट्रम्प यांचा विजय अनेक अर्थानी भारताच्या फायद्याचा आहे. बांग्लादेशाला याची किंमत चुकवावी लागेल. पुढच्या चार वर्षांसाठी डोनाल्ड ट्रम्प सत्ता सांभाळणार आहेत. अमेरिकेच्या या निवडणुकीवर भारतासह सगळ्या जगाची नजर होती. अमेरिकेत ट्रम्प यांचे पुनरागमन हे भारतासह आशिया खंडातील हिंदुंसाठी एक मोठा टर्निंग पॉइंट आहे. ट्रम्प यांनी अलीकडेच एका स्टेटमेंट केले. त्यात त्यांनी शेजारच्या बांग्लादेशात हिंदुविरोधात सुरु असलेल्या अत्याचारावर चिंता व्यक्त केली होती. यावरुन त्यांनी बायडेन प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण केले होते. शेख हसीना यांचे सरकार गेल्यानंतर भारताने बांग्लादेशातील हिंदू सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला आहे.

प्राचीन भारतातील स्त्रियांचा दर्जा आणि आजच्या काळातील स्त्रियांचा दर्जा यांची तुलना होणे गरजेचे आहे. कारण त्या काळात स्त्रियांचे स्थान आणि आजच्या काळातील स्थान यात काय फरक पडला आहे काय हेही पाहणे तेवढेच गरजेचे आहे.

## प्राचीन भारतातील स्त्रियांचा दर्जा

वैदिक कालखंडाला ऋगवेद कालखंड असेही म्हणतात. कारण या कालखंडात ऋग्वेदाची रचना झाली. या काळातील सामाजिक संस्कृती ऋग्वेदकालीन संस्कृती म्हणूनही मानली जाते. या कालखंडातील समाज पितृप्रधान म्हणजे पुरुषप्रधान होता. असे असले तरी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क होते. स्त्रियांना स्वतःचा विकास करण्यासाठी, शिक्षण विवाह, संपत्ती वारसा याबाबतचे अधिकार होते. स्त्रियांना विविध विद्या, कला शिकण्याचा अधिकार होता. विद्या शिकण्याचा दोन प्रकारचा हक्क होता. विवाह होईपर्यंत विद्याभास व जीवनभर विद्याभ्यास स्त्रिया करू शकत होत्या. स्त्रिया वेदाचा अभ्यासही करू शकत होत्या. विश्वतारा, अपाला, घोषा, रोषमा, लोपामुद्रा ह्या त्या काळातील विदुषी होत्या. या सर्व स्त्रियांनी स्वतंत्रपणे ऋचा रचल्या होत्या. स्त्री पौरोहित्या ची पद्धत वैदिक काळात होती. विश्वतारा हिने स्वतः यज्ञाचे पौरोहित्य केले. व अन्य स्त्रियांनाही तसे करण्याचा उपदेश केला. तिला यज्ञकर्ती म्हटल्या



जात असे. या काळात विवाह ही धार्मिक संस्था होती. पुरुषाला गृहःथाश्रमात जी धार्मिक कृत्ये पार पाडावी लागत ती स्त्रियांच्या मदतीनेच पार पाडावी लागत. या काळात बालविवाह पद्धत नव्हती. स्त्रियांचे विवाह प्रौढ पणी होत असत. पालक वर्ग आपल्या मुलीच्या पसंतीचा विचार करीत. आणि त्यानुसार स्त्रीच्या पतीची निवड केली जात असे. प्रेम विवाह करण्याची मुभा या काळात स्त्रियांना होती. या काळात स्त्रियांना मानाचे स्थान होते. हे एक पत्नी पद्धती वरून दिसून येते. पुरुष एकापेक्षा जास्त पत्नी करीत नसत. कुटुंबात स्त्रीला आदराचे स्थान होते. तिला कुटुंबात मान मिळत होता. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पती निधना नंतर विधवेची इच्छा असेल तर तिला पुनर्विवाह करण्याची मोकळीक दिली गेली होती. समाज अशा विवाहाला विरोध करीत नव्हता. स्त्रियांना विवाहाची सक्ती नव्हती. शारीरिक वैगुण्य असलेल्या स्त्रिया विवाह न तशाच राहत असत. संपत्तीत देखील त्यांना अधिकार होता. आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी त्या काळात स्त्री होती. सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या सण, समारंभ, उत्सवात सहभागी होण्याचे स्वातंत्र्य होते. वेदकालीन स्त्रियांचा दर्जा पुरुषा प्रमाणेच होता. शिक्षण, विवाह, अर्थ, मालमत्ता, कुटुंब, सार्वजनिक जीवनात तिला स्वातंत्र्य आणि सवलती होत्या. स्त्री संबंधी असणाऱ्या प्रथा, परावलंबन, पिळवणूक या पासून ही स्त्री मुक्त होती. उत्तर वैदिक कालखंडात मात्र पितृसत्ताक कुटुंब पद्धतीत पुरुषांचे महत्त्व अधिक वाढले व स्त्रियांचे अधिकार, सवलती आणि स्वातंत्र्या वर मर्यादा आल्या. स्त्रियांच्या वेदाभ्यासावर बंधन आले नसले तरी समाज तो अभ्यास स्त्रियांस करू देण्यास फारसा उत्सुक राहिला नाही. तरीही गार्गी, मैत्रयी, अत्रेयी ह्या विदुषी या काळात होऊन गेल्या.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे 50 जाहीरनामे!

## 50 मतदारसंघांसाठी वेगळा जाहीरनामा सादर करण्यात येणार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभेच्या अनुषंगाने सर्व पक्षांनी जय्यत तयारी केली आहे. पक्षांचे जाहीरनामे प्रसिध्द होत आहेत, आज राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाने आपला जाहीरनामा प्रसिध्द केला. पक्षाचे अध्यक्ष अजित पवारांनी बारामतीत पत्रकार परिषद घेतली. त्यांच्या पक्षाचा जाहीरनामा सादर केला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडणूक लढवत असलेल्या 50 मतदारसंघांसाठी वेगळा जाहीरनामा सादर करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. तर बारामतीकरांसाठीचा जाहीरनाम्यात अनेक गोष्टींवर भर देण्यात येत आहे.**



बारामती शहराला कुस्तीची परंपरा आहे. त्यामुळे बारामतीत महाराष्ट्रातील पहिली जागतिक दर्जाची क्रीडा आकादमी उभी करण्याची घोषणा अजित पवारांनी केली आहे. या अकादमीमध्ये बॉक्सिग, कुस्ती, भालाफेक, शुटींग, पोहणे इत्यादी प्रकारचे खेळ शिकवून खेळाडू तयार केले जातील. त्याचबरोबर आधुनिक सुविधा, वैधानिक कोचिंग आणि प्रशिक्षण महाराष्ट्रातील खेळाडूंना दिले जाईल. शेतकऱ्यांसाठी पाच हजार कृषी अधारित फूड प्रोसेसिंग युनिटचे एक नेटवर्क तयार केले आहे. यासोबतच बारामतीमध्ये लवकरच एक लॉजेस्टिक पार्क उभारण्यात येईल, यामुळे स्थानिकांना आजूबाजूच्या नागरिकांना रोजगार उपलब्ध होईल. बारामतीत जागतिक क्रीडा अकादमी सुरू करण्यात येईल. पंजाब आणि हरियाणातून प्रेरणा घेऊन अकादमी सुरू केली जाणार आहे. बॉक्सिंग आणि भालाफेक शिकवलं जाईल. बारामतीला पहिलं सौर ऊर्जा असलेलं शहर बनवलं जाणार आहे. बारामतीत कॅन्सरसाठी कर्करोग रुग्णालय उभारण्यात येणार आहे. कर्करोगासाठी पुणे आणि मुंबईला जाण्याची गरज पडणार नाही, असंही यावेळी त्यांनी म्हटलं आहे. शेतकरी सन्मान योजना आम्ही 15 हजार रुपये करणार आहोत. कर्जमाफी आणि अतिरिक्त अनुदान आम्ही देणार आहोत. 20 टक्के अधिक अनुदान असेल. राज्यातील ग्रामीण भागात 45 हजार पानंद रस्ते करणार आहोत, असं राष्ट्रवादी काँग्रेसकडून जाहीरनाम्यात सांगण्यात आलं आहे. ज्या विधानसभा मतदारसंघात आमचे उमेदवार उभे आहेत तिथला जाहीरनामा वेगळा असेल. त्यामुळे अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाने 50 जाहीरनामे सादर केले आहेत. सुनील तटकरे हे मुंबईतून राज्यव्यापी जाहीरनामा असलेली पुस्तिका प्रकाशित करत आहेत. प्रत्येक भागाच्या विशेष गरजा लक्षात घेऊन आम्ही काम करत असल्याचं अजित पवार म्हणाले. शेतकरी कष्टकरी यांच्याशी चर्चा करून त्यांच्या गरजांना या जाहीरनाम्यात प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला आहे, ही माहिती अजित पवारांनी यावेळी दिली. तसेच जे शक्य आहे ते देण्याचा प्रयत्न करत या जाहीरनाम्यातून केला आहे. आज बारामतीचा उमेदवार म्हणून हा जाहीरनामा सादर करत असल्याचा मला अभिनान आहे.

### जाहीरनाम्यात आणखी काय आहे?

लाडकी बहिण योजने संदर्भात बहिणींना दीड हजर नाही तर तबल 2100 रुपये देण्यात येणार आहे; सोबत महिला सुरक्षेसाठी 25 हजार महिलांना पोलिस दलात समावेश करण्याचा वादा करण्यात आला आहे; धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी 25 हजार रुपये देण्याचा वादा करण्यात आला आहे; ग्रामीण भागात 45000 पाणंद रस्त्यांच्या निर्मितीचा वादा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून करण्यात आलेला आहे; शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा आणि शेती पिकांच्या एम.एस.पी वरती 20% अनुदान देण्याचा वादा अजित दादांच्या पक्षाकडून करण्यात आलेला आहे; वीज बिलात 30% कपात करून सौर व अक्षय ऊर्जेला प्राधान्य देण्याचा वादा करण्यात आला आहे; वृद्ध पेन्शन धारकांना आता पंधराशे वरुन महिन्याला 2100 रुपये देण्याचा वादा करण्यात आला आहे; दहा लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षणातून महिन्याला दहा हजार रुपये विद्यावेतनाचा वादा करण्यात आलेला आहे; 25 लाख रोजगार निर्मितीचा वादा देखील केला आहे.

---

# मविआचे नेते लाडकी बहीण योजनेच्या विरोधात

## योजनेच्या राज्यातील अडीच कोटी महिला लाभार्थी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुण्यातील पर्वती विधानसभा मतदार संघाच्या उमेदवार आणि विद्यमान आमदार माधुरी मिसाळ यांच्या प्रचारार्थ आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवरून महाविकास आघाडीतील नेत्यांनी केलेल्या टीकेचा समाचार घेत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लाडकी बहीण योजना अंमलात आणली त्यावेळेस आमच्यावर मोठ्या प्रमाणात टीका करून योजना फसवी असल्याचे सांगण्यात आले.**



मात्र या योजनेच्या राज्यातील अडीच कोटी महिला लाभार्थी ठरल्या आहेत. त्या सर्व महिलांच्या खात्यात आतापर्यंत पैसे जमा झाले आहेत. तसेच महाविकास आघाडीचे नेते लाडकी बहीण योजनेच्या विरोधात असून त्यांनी न्यायालयात देखील दाद मागून योजना म्हणजे पैशाचा चुरडा असल्याचे सांगितले. पण आम्ही योजना बंद होऊ दिली नाही आणि भविष्यात देखील लाडकी बहीण योजना बंद करणार नसल्याचे सांगत विरोधकांना चांगलेच सुनावले. राज्यातील महिला वर्गासाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणल्यानंतर महाविकास आघाडीतील नेत्यांनी या योजनेबाबत अनेक मुद्दे उपस्थित करीत महायुतीमधील नेत्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला.पक्षातील नेत्यांकडून हा मुद्दा उपस्थित केला जात असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घोषणा पत्र जाहीर केले आहे.

### 1500 ऐवजी 2100 रुपये दिले

त्यामध्ये महायुतीच सरकार आल्यावर लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना १५०० ऐवजी २१०० रुपये दिले जातील अशी घोषणा केली आहे. या घोषणेची आज दिवसभर राजकीय वर्तुळात चर्चा ऐकण्यास मिळाली.
यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार पंकजा मुंडे, शहराध्यक्ष धीरज घाटे, आमदार माधुरी मिसाळ, माजी मंत्री विजय शिवतारे, अमित गोरखे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष दीपक मानकर, शिवसेनेचे शहरप्रमुख नाना भानगिरे यांच्यासह आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत ट्रम्प विजयी!

## पुन्हा निवडणूक जिंकणारे ट्रम्प हे पहिले राष्ट्राध्यक्ष

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प विजयी झाले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर 4 वर्षांच्या कालावधीनंतर पुन्हा निवडणूक जिंकणारे ट्रम्प हे पहिले राष्ट्राध्यक्ष ठरले आहेत. ट्रम्प 2016 मध्ये पहिल्यांदा राष्ट्राध्यक्ष झाले. 2020 च्या निवडणुकीत ते जो बायडेन यांच्याकडून पराभूत झाले. 132 वर्षांपूर्वी ग्रोव्हर क्लीव्हलँड दोनदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. 1884 आणि 1892च्या अध्यक्षीय निवडणुका त्यांनी 4 वर्षांच्या अंतराने जिंकल्या. ट्रम्प 4 वर्षांनी व्हाईट हाऊसमध्ये परतणार आहेत. ते 2017 ते 2021 पर्यंत राष्ट्राध्यक्ष होते. कमला हॅरिस या निवडणुकीत विजयी झाल्या असत्या तर त्यांनी पहिल्या महिला राष्ट्राध्यक्ष बनून इतिहास रचला असता. त्या सध्या अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्ष आहेत.**



अमेरिकेतील 538 जागांपैकी ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला 277 जागा मिळाल्या आहेत. बहुमतासाठी 270 जागांची आवश्यकता आहे. त्याचबरोबर कमला हॅरिस यांच्या पक्षाने 224 जागा जिंकल्या आहेत. दोघांमध्ये केवळ 43 जागांचा फरक आहे. मात्र, उर्वरित सर्व 5 राज्यांमध्ये ट्रम्प आघाडीवर आहेत. अशा परिस्थितीत चुरशीची लढत देऊनही कमला यांचा निवडणुकीत पराभव झाला आहे. राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीसोबतच अमेरिकन संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या, सिनेट आणि प्रतिनिधीगृहाच्या निवडणुकाही झाल्या. रिपब्लिकन पक्षाला सिनेटमध्ये बहुमत मिळाले असून हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये आघाडीवर आहे. विजयानंतर अमेरिकन जनतेला संबोधित करताना ट्रम्प म्हणाले - मी अमेरिकेला पुन्हा एकदा महान बनवणार आहे. या दिवसासाठी देवाने माझा जीव वाचवला होता. ट्रम्प यांच्यावर 13 जुलै रोजी पेनसिल्व्हेनियामध्ये हल्ला झाला होता. एक गोळी कानाला लागली आणि बाहेर गेली. या हल्ल्यात त्यांचा जीव थोडक्यात बचावला. निवडणुकीत विजय निश्चित झाल्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिकेतील जनतेचे आभार मानले. ते म्हणाले, लोकांना जे अशक्य वाटले ते आम्ही केले. देशाचे सर्व प्रश्न मी सोडवीन. अलास्का, नेवाडा आणि ॲरिझोनामध्ये जिंकणे माझ्यासाठी मोठे आहे. हे अविश्वसनीय आहे. ट्रम्प म्हणाले की, मी अमेरिकन लोकांच्या कुटुंबासाठी आणि त्यांच्या भविष्यासाठी लढणार आहे.

पुढील 4 वर्षे अमेरिकेसाठी महत्त्वाची आहेत. अमेरिकेच्या इतिहासातील हा सर्वात मोठा विजय असल्याचे ट्रम्प म्हणाले.

### कमला सर्व स्विंग स्टेटमध्ये मागे

गेल्या निवडणुकीत ट्रम्प यांनी फक्त एक स्विंग स्टेट, नॉर्थ कॅरोलिना जिंकले. स्विंग स्टेट्स ही अशी राज्ये आहेत जिथे दोन पक्षांमधील मतांचे अंतर खूपच कमी आहे. हे कोणत्याही मार्गाने जाऊ शकतात. या राज्यांमध्ये 93 जागा आहेत.अमेरिकेतील 538 जागांपैकी ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला 277 जागा मिळाल्या आहेत. बहुमतासाठी 270 जागांची आवश्यकता आहे. त्याचबरोबर कमला हॅरिस यांच्या पक्षाने 224 जागा जिंकल्या आहेत. दोघांमध्ये केवळ 43 जागांचा फरक आहे. मात्र, उर्वरित सर्व 5 राज्यांमध्ये ट्रम्प आघाडीवर आहेत. अशा परिस्थितीत चुरशीची लढत देऊनही कमला यांचा निवडणुकीत पराभव झाला आहे. राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीसोबतच अमेरिकन संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या, सिनेट आणि प्रतिनिधीगृहाच्या निवडणुकाही झाल्या. रिपब्लिकन पक्षाला सिनेटमध्ये बहुमत मिळाले असून हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये आघाडीवर आहे.

एलन मस्क यांचे कौतुक करताना ट्रम्प म्हणाले- एलन एक स्टार आहे. निवडणुकीच्या प्रचारात त्यांनी रॉकेटप्रमाणे उड्डाण केले. अध्यक्षीय निवडणुकीसोबतच अमेरिकन संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या, सिनेट आणि प्रतिनिधीगृहाच्या निवडणुकाही झाल्या. यामध्ये ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाने सिनेट म्हणजेच वरिष्ठ सभागृहात विजय मिळवला आहे. त्यांना 93 पैकी 51 जागा मिळाल्या. बहुमतासाठी 50 जागांची गरज होती. हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्येही रिपब्लिकन आघाडीवर आहेत. कॉंग्रेसच्या कनिष्ठ सभागृहात म्हणजेच हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हमध्ये डेमोक्रॅट्सना 133 जागा मिळाल्या आहेत, तर रिपब्लिकनला 174 जागा मिळाल्या आहेत. यात 435 सदस्य आहेत, त्यांचा कार्यकाळ दोन वर्षांचा आहे.कमला हॅरिस यांचा राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत पराभव झाला, याचे एकमेव कारण म्हणजे स्विंग स्टेट्स. कमला यांना यापैकी एकातही आघाडी मिळाली नाही.

# योगी सरकारला सर्वोच्च न्यायालयाने फटकारलं

## बुलडोझर कारवाई: योगी सरकारला25 लाखांच्या भरपाईचे आदेश

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशातील महाराजगंज जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी एका निवासी घरावर आणि दुकानावर बुलडोझर चालवत कारवाई करण्यात आली होती. या कारवाईनंतर उत्तर प्रदेश सरकारवर अनेकांनी टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं होतं. आता या प्रकरणावरील सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला चांगलंच फटकारलं आहे.**



एवढंच नाही तर घर पाडल्याबद्दल उत्तर प्रदेश सरकारला २५ लाख रुपयांची नुकसान भरपाईचे देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. तसेच घरावर बुलडोझर कारवाई केल्यामुळे हा अधर्म आहे, अशी टिप्पणी देखील यावेळी न्यायालयाने केली.सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारवर बेकायदेशीरपणे निवासी घरे पाडल्याबद्दल ताशेरे ओढले आहेत. २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयात रस्ता रुंदीकरण प्रकल्पासाठी घरे पाडण्याशी संबंधित प्रकरणाची याचिका दाखल करण्यात आली होती.

### बुलडोझर कारवाई हा अधर्म आहे

तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकारवर ताशेरे ओढले. यावेळी न्यायालयाने म्हटलं की, उत्तर प्रदेश सरकारची ही कारवाई कायदा आणि सुव्यवस्थेचं उल्लंघन करणारी आहे. पण तुम्ही लोकांची घरं कशी पाडू शकता? तसेच तुम्ही या कारवाईबाबत कोणतीही सूचना का दिली नाही? लोकांच्या घरात घुसून ही कारवाई करण्यात आली. घरावर बुलडोझर कारवाई हा अधर्म आहे, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.

हे प्रकरण महाराजगंज जिल्ह्यातील आहे. मनोज टिब्रेवाल आकाश यांच्यावतीने ही याचिका दाखल करण्यात आली होती. २०१९ मध्ये पाडण्यात आलं होतं, असं याचिकेत म्हटलं आहे. तसेच हे घर पाडण्याच्या आधी आपल्याला कोणत्याही प्रकारची नोटीस देण्यात आली नव्हती. या संपूर्ण प्रकरणावर आज सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

## व्हेकेशन एन्जॉय करताना दिसली ऐश्वर्या



ऐश्वर्या राय-बच्चन व अभिषेक बच्चन यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाल्याची चर्चा गेल्या कित्येक दिवसांपासून रंगली आहे. अनंत अंबानी व राधिका मर्चंट यांच्या लग्नाला ऐश्वर्या बच्चन कुटुंबासह एकत्र उपस्थित न राहिल्यामुळे दोघांच्या घटस्फोटाच्या चर्चेला वाव मिळाला होता. त्यानंतर काही दिवसांपूर्वी अभिषेक बच्चनने देखील अशी काही पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली होती; ज्यामुळे ऐश्वर्याबरोबर घटस्फोट झाल्याच्या चर्चांना आणखीन उधाण आलं. पण ऐश्वर्या-अभिषेकच्या घटस्फोटाच्या दाव्यात किती तथ्य आहे, हे येत्या काळातच स्पष्ट होईल. मात्र या घटस्फोटाच्या चर्चेदरम्यान ऐश्वर्या न्यूयॉर्कमध्ये व्हेकेशन एन्जॉय करताना दिसत आहे. तिचा न्यूयॉर्कमधील एका प्रसिद्ध अभिनेत्रीबरोबरचा फोटो व्हायरल झाला आहे.अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चन ( AISHWARYA RAI BACHCHAN ) सध्या मुंबईपासून दूर न्यूयॉर्कमध्ये व्हेकेशन एन्जॉय करत आहे. तिच्याबरोबर अभिषेक बच्चन नसून लाडकी लेक आराध्या आहे. ऐश्वर्या आराध्याबरोबर न्यूयॉर्कमध्ये व्हेकेशन एन्जॉय करताना दिसत आहे. प्रसिद्ध अभिनेत्री आणि पॉडकास्टर जेरी रेयनाने सोशल मीडियावर ऐश्वर्या राय-बच्चनबरोबरचे दोन फोटो शेअर केले आहेत. याआधीही जेरी ऐश्वर्याला भेटली होती. या जुन्या भेटीचा फोटो आणि नुकत्याच झालेल्या भेटीचा फोटो जेरीने शेअर केला आहे. ऐश्वर्याबरोबरचे हे फोटो शेअर करत तिनं लिहिलं आहे, "आपल्या आयुष्यातील आदर्श व्यक्तिला दोनदा भेटणं हे भाग्यशाली आहे. ऐश, माझ्याशी नेहमी खूप चांगलं वागल्याबद्दल धन्यवाद. माझ्या आयुष्यात तुझ्या येण्याने काय परिणाम झाला हे मी तुला सांगितलं. तू माझ्या सर्व गोष्टी लक्षपूर्वक ऐकल्यास त्याबद्दल तुझे आभार मानणं हे माझं नेहमीच एक स्वप्न होतं.

## तमन्ना भाटियाचा सन्मान



अभिनेत्री तमन्ना भाटिया तिच्या कामामुळे सध्या जोरदार चर्चेत आहे. वेब सिरीज 'जी कारदा, लस्ट स्टोरीज 2 , जेलर आणि भोला शंकर' या आगामी प्रोजेक्ट्स साठी ती चर्चेचा विषय ठरली आहे. यंदाचा अभिमानाचा क्षण म्हणजे ती ग्रँड मार्शल म्हणून आगामी एनजे इंडिया डे परेडचं नेतृत्व करणार होती. तमन्ना भाटिया तिच्या करिष्माई ऑन-स्क्रीन उपस्थिती आणि अष्टपैलू अभिनय कौशल्यासाठी ओळखली जाते. या अभिनेत्रीने भारतातील एनेक भाषांमधील चित्रपटांमध्ये काम करत आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत . सिनेसृष्टीतील रसिकांमध्ये ती एक प्रिय व्यक्ती बनली आहे. 'एनजे इंडिया डे परेड'च्या ग्रँड मार्शल म्हणून तिची निवड केवळ तिची शानदार कारकीर्दच नव्हे तर मनोरंजन उद्योगातील तिचा प्रेरणादायी प्रवास देखील प्रतिबिंबित करते. या परेडमध्ये भारतीय-अमेरिकन सामाजिक दिनदर्शिकेवर प्रकाश टाकण्यात आला जो भारतीय संस्कृती, परंपरा आणि राष्ट्राच्या कर्तृत्वाच्या नेत्रदीपक प्रदर्शनात विकसित झाला.

हा कार्यक्रम रंग, संगीत, नृत्य आणि फ्लोट्सचा कॅलिडोस्कोप होता, ज्यामध्ये भारताचे सार आणि डायस्पोरा समाविष्ट होते. परेडच्या नेत्याची तमन्ना भाटियाची भूमिका संस्कृतीला जोडण्यासाठी आणि एकात्मतेला प्रोत्साहन देण्यासाठी तिची बांधिलकी दर्शवते आणि परेडमध्ये तिचा सहभाग या कार्यक्रमाचे सांस्कृतिक महत्त्व वाढवण्यासाठी तयार झाला, ज्याने अधिक वैविध्यपूर्ण आणि उत्साही प्रेक्षक आकर्षित केले. तमन्ना भाटिया देखील आगामी प्रकल्पांच्या रोमांचक लाइनअपसाठी तयार आहे. यामध्ये मल्याळम चित्रपट बांद्रा, तमिळ चित्रपट अरनामनाई 4 आणि जॉन अब्राहम सोबतचा हिंदी उपक्रम वेदा यांचा समावेश आहे.

## प्रियंका चोप्रा रडली

प्रियंका चोप्रा आणि निक जोनास हे कपल सोशल मिडीयावर चर्चेत असतं. प्रियंका आणि निक यांची जोडी सोशल मिडीयावर कमालीची पसंत केली जाते. प्रियंकाचं नवऱ्यावर किती प्रेम आहे याचा अनुभव नुकताच आला. निक जोनासचा कॉन्सर्टमधला एक व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झालाय. या व्हिडीओत प्रियंका चोप्राच्या डोळ्यात नवऱ्याला लाईव्ह परफॉर्म करताना पाहून डोळ्यात पाणी आलं. बघुया सविस्तर काय झालं.

अलीकडेच.. प्रियंका चोप्राने तिच्या इंस्टाग्राम हँडलवर तिचा पती निकसाठी एक अतिशय गोड नोट लिहिली. या पोस्टमध्ये प्रियंकाने निकला त्याच्या नवीन कॉन्सर्टसाठी शुभेच्छाही दिल्या आहेत. निक जोनासचा कॉन्सर्ट सोशल मिडीयावर तुफान व्हायरल झाला. या कॉन्सर्टमध्ये प्रियंका सुद्धा उपस्थित होती. यावेळी नवऱ्याला स्टेजवर लाईव्ह परफॉर्म करताना प्रियंकाच्या डोळ्यातील अश्रू पुसताना दिसली. प्रियंकाच्या डोळ्यात आलेलं हे पाणी निश्चितच आनंद होतं प्रियंकाने तिच्या चिठ्ठीत लिहिले की, 'निक तू एक चुंबक आहेस आणि मी खूप भाग्यवान आहे की तू माझ्यासोबत आहेस. एक नवीन आणि सुंदर प्रवास सुरू केल्याबद्दल निकचे अभिनंदन.

## रणबीरने केलेले विधान चर्चेत

ज्याप्रमाणे कलाकारांची चित्रपटातील भूमिका चाहत्यांसाठी उत्सुकतेचा विषय असतो, त्याप्रमाणेच या कलाकारांच्या खासगी आयुष्याबद्दलदेखील चाहत्यांना उत्सुकता असते. त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींबरोबर ते कसा वेळ घालवतात, त्यांच्या आयुष्यात काय चालले आहे, याबद्दल चाहत्यांना उत्सुकता असते. आता रणबीर कपूर( RANBIR KAPOOR ) ने त्याचे कुटुंबाबरोबर कसे संबंध आहेत, याबद्दल वक्तव्य केले आहे. रणबीर कपूरने नुकताच निखिल कामथच्या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. या पॉडकास्टमध्ये त्याने अनेक गोष्टींचा खुलासा केला आहे. रणबीरचा त्याच्या बहिणीबरोबर मोठा होतानाचा अनुभव कसा होता, असा प्रश्न विचारला होता. त्यावर उत्तर देताना त्याने म्हटले, "माझी बहीण माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठी आहे. माझं तिच्यावर खूप प्रेम आहे. लहान असताना आम्ही एकाच खोलीत राहायचो.

## कतरिनाशी केलेल्या तुलनेने माझे करिअर उद्ध्वस्त



बॉलीवूडचे कलाकार हे सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या चित्रपटातील भूमिकांमुळे, कधी त्यांनी शेअर केलेल्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे, तर कधी त्यांनी मुलाखतीदरम्यान केलेल्या वक्तव्यांमुळे हे कलाकार चर्चांचा भाग बनतात. आता अभिनेत्री झरीन खानने कतरिना कैफबरोबर तुलना झाल्याने तिचे करिअर उद्ध्वस्त झाल्याचे वक्तव्य केले आहे.प्रसिद्ध कॉमेडियन भारती आणि हर्ष लिंबाचिया यांच्या पॉडकास्टमध्ये झरीन खानने हजेरी लावली होती. यामध्ये तिने आपल्या करिअरबद्दल वक्तव्य केले आहे. 'वीर' चित्रपटानंतर तिचा करिअरचा अनुभव कसा होता हे सांगताना ती म्हणते, "'वीर' चित्रपटानंतर माझे आयुष्य पूर्णपणे बदलले आहे. तो चित्रपट खूप मोठा होता आणि आतासुद्धा माझ्यासाठी माझे आयुष्य बदलणारा चित्रपट आहे. त्या चित्रपटानंतर मला वाईट अनुभव आले आहेत. माझी तुलना कतरिना कैफबरोबर केली जात होती. सुरुवातीला मला छान वाटले, कारण कतरिना खूप सुंदर आहे. पण, मला वाटते की ही गोष्ट इंडस्ट्रीमध्ये चुकीच्या पद्धतीने पसरली. माझ्यासाठी कतरिनाबरोबर तुलना होणे ही गोष्ट खूप मोठी होती, पण ती वाईट ठरली. या इंडस्ट्रीमधल्या अनेक लोकांना मी ओळखत नाही. अनेक दिग्दर्शक आणि निर्माते यांना फक्त मी त्यांच्या नावाने ओळखते. पण, सलमान खानने मला चित्रपटात आणले आहे म्हणून मी गर्विष्ठ आहे, असा अनेकांचा समज झाला."झरीन खान पुढे बोलताना म्हणते की, माझ्यावर इतक्या मोठ्या प्रमाणात टीका होत होती की एक वेळ अशी आली, मला घराबाहेर पडणे अशक्य होऊ लागले. लोक माझ्या कपड्यांवर कंमेट करू लागले. माझे वजन जास्त आहे, असेही म्हटले गेले. मी काय करणार होते? मला अनेक नावे दिली गेली.

# ऋषभ पंतने 5 स्थानांनी घेतली झेप

## ऋषभ पंतचा आईबरोबरचा व्हीडिओ होतोय व्हायरल

नवी दिल्ली ।
।वृत्तसंस्था

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात २२ नोव्हेंबरपासून बॉर्डर गावस्कर ट्रॉफी सुरू होत आहे. या मालिकेत दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामने खेळवले जाणार आहेत. या मालिकेतील पहिला सामना पर्थ स्टेडियमवर होणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघातील खेळाडू वेगवेगळ्या बॅचमध्ये ऑस्ट्रेलियाला जाणार असून, त्याचीही सुरुवात झाली आहे. केएल राहुल आणि ध्रुव जुरेल आधीच ऑस्ट्रेलियाला पोहोचले आहेत. आता टीम इंडियाचा यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत ऑस्ट्रेलियाला रवाना झाला आहे. त्याचा एक व्हिडिओही समोर आला आहे, ज्यामध्ये तो त्याच्या आईबरोबर दिसत आहे.**



बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी ऋषभ पंत बुधवारी ऑस्ट्रेलियाला रवाना झाला. यावेळी तो त्याच्या आईबरोबर विमानतळावर पोहोचला होता. ज्याचा व्हिडिओही समोर आला आहे. बुधवारी बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलियाला रवाना होण्यापूर्वी ऋषभ पंतने कारमधून उतरल्यावर आईचे आशीर्वाद घेतले आणि मग तो पुढे निघाला. ऋषभ पंतचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आम्ही तुम्हाला सांगतो, कार अपघातानंतर ऋषभ पंतचा हा पहिलाच ऑस्ट्रेलिया दौरा आहे.ऋषभ पंतची अलीकडची कामगिरी पाहता तो भारतासाठी सर्वात महत्त्वाचा खेळाडू असणार आहे. नुकत्याच झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत तो सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. पंतने सहा डावात ४३.५० च्या सरासरीने २६१ धावा केल्या. ज्यामध्ये तीन अर्धशतकांचा समावेश होता, त्यादरम्यान त्याने ९९ धावांची खेळीही खेळली. किभारताला ऑस्ट्रेलियाविरूद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. टीम इंडियाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये पोहोचायचं असेल तर ही मालिका कोणत्याही किंमतीवर जिंकावी लागेल. न्यूझीलंडविरुद्ध नुकत्याच झालेल्या मालिका पराभवामुळे, भारताची जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचण्याची शक्यता धुसर झाली आहे, कारण गुणांची टक्केवारी घसरली आहे. संघाची टक्केवारी ५८.३३% पर्यंत घसरली, ज्यामुळे ते जागतिक कसोटी चॅम्पियनशिप क्रमवारीत ऑस्ट्रेलियाच्या मागे दुसऱ्या स्थानावर आहेत. आता टीम इंडियाला फायनलमध्ये पोहोचण्यासाठी ऑस्ट्रेलियाला किमान ४ सामन्यांमध्ये पराभूत करावे लागेल.वी संघापूर्वी बांगलादेशविरुद्ध शतक झळकावून त्याने कसोटी क्रिकेटमध्ये पुनरागमन केले होते. त्या मालिकेतील २ सामन्यांत त्याने ५३.६६ च्या सरासरीने १६१ धावा केल्या. त्याचबरोबर मागील ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर ऋषभ पंत टीम इंडियाच्या विजयाचा हिरो ठरला होता. त्याने गब्बा येथे शानदार खेळी खेळली आणि संघाला ऐतिहासिक मालिका विजय मिळवून दिला.भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात २२ नोव्हेंबरपासून बॉर्डर गावस्कर ट्रॉफी सुरू होत आहे. या मालिकेत दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामने खेळवले जाणार आहेत. या मालिकेतील पहिला सामना पर्थ स्टेडियमवर होणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघातील खेळाडू वेगवेगळ्या बॅचमध्ये ऑस्ट्रेलियाला जाणार असून, त्याचीही सुरुवात झाली आहे. केएल राहुल आणि ध्रुव जुरेल आधीच ऑस्ट्रेलियाला पोहोचले आहेत. आता टीम इंडियाचा यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत ऑस्ट्रेलियाला रवाना झाला आहे. त्याचा एक व्हिडिओही समोर आला आहे, ज्यामध्ये तो त्याच्या आईबरोबर दिसत आहे.बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी ऋषभ पंत बुधवारी ऑस्ट्रेलियाला रवाना झाला. यावेळी तो त्याच्या आईबरोबर विमानतळावर पोहोचला होता. ज्याचा व्हिडिओही समोर आला आहे. बुधवारी बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलियाला रवाना होण्यापूर्वी ऋषभ पंतने कारमधून उतरल्यावर आईचे आशीर्वाद घेतले आणि मग तो पुढे निघाला. ऋषभ पंतचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आम्ही तुम्हाला सांगतो, कार अपघातानंतर ऋषभ पंतचा हा पहिलाच ऑस्ट्रेलिया दौरा आहे.

### याला म्हणतात संस्कार!

भारताला ऑस्ट्रेलियाविरूद्ध पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळायची आहे. टीम इंडियाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये पोहोचायचं असेल तर ही मालिका कोणत्याही किंमतीवर जिंकावी लागेल. न्यूझीलंडविरुद्ध नुकत्याच झालेल्या मालिका पराभवामुळे, भारताची जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचण्याची शक्यता धुसर झाली आहे, कारण गुणांची टक्केवारी घसरली आहे. संघाची टक्केवारी ५८.३३% पर्यंत घसरली, ज्यामुळे ते जागतिक कसोटी चॅम्पियनशिप क्रमवारीत ऑस्ट्रेलियाच्या मागे दुसऱ्या स्थानावर आहेत.

# जलाज सक्सेनाने रणजी ट्रॉफीत घडवला इतिहास

## आजवर कोणालाच नाही जमलं ते करून दाखवलं

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्या रणजी ट्रॉफीचे सामने खेळवले जात आहेत. या सामन्यात केरळच्या जलाज सक्सेना मोठा इतिहास घडवला आहे. जलाज सक्सेना रणजी क्रिकेटच्या इतिहासातील उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू ठरला असून त्याने अशी कामगिरी केली आहे, जी आजवर कोणालाही जमली नाही. आज म्हणजेच बुधवार ६ नोव्हेंबर रोजी थुंबा येथे खेळवल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेशविरुद्धच्या सामन्यात त्याने हा पराक्रम आपल्या नावे केला आहे.**





जलाज सक्सेना हा रणजी ट्रॉफीमध्ये ६ हजार धावा आणि ४०० विकेट्स घेणारा पहिला खेळाडू ठरला आहे. कोलकाता येथे मागील फेरीत ६ हजार धावांचा टप्पा त्याने गाठला होता आणि आता उत्तर प्रदेशविरुद्ध चौथी विकेट घेत त्याने या अनोख्या पराक्रमाची नोंद केली. ही त्याची रणजी ट्रॉफीतील ४००वी विकेट होती.नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करणाऱ्या केरळने भेदक गोलंदाजीच्या जोरावर उत्तर प्रदेशचे कंबरडे मोडले. सक्सेनाने यूपीचा डावखुरा फलंदाज नितीश राणाला स्टंप आऊट करून ४०० वा विकेट घेण्याचा पराक्रम केला. सक्सेनाने यानंतर लवकरच त्याची पाचवी विकेट घेतली. रणजी करंडक स्पर्धेत त्याने आतापर्यंत २९ वेळा पाच विकेट्स घेण्याची कामगिरी केली आहे. ही त्याची यूपीविरुद्धची सर्वोत्तम कामगिरी आहे. यूपी हा १८वा संघ आहे पंकज सिंगची बरोबरी केली आहे.३७ वर्षीय सक्सेना हा रणजी ट्रॉफीच्या इतिहासातील ४०० विकेट्सचा टप्पा गाठणारा केवळ १३वा गोलंदाज आणि ही कामगिरी करणारा एकमेव सक्रिय क्रिकेटपटू आहे.

### 400 विकेट्स घेणारा क्रिकेटपटू

२०१६-१७ हंगामात केरळला जाण्यापूर्वी त्याने एकूण १५९ विकेट घेतल्या आणि संघासाठी ४०४१ धावा केल्या. केएन अनंतपद्मनाभन यांच्यानंतर केरळचा दुसरा सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज बनला आहे. सक्सेना रणजी ट्रॉफीमध्ये संघासाठी २००० धावा पूर्ण करण्याच्या जवळ आहे.देशांतर्गत क्रिकेटमध्ये चमकदार कामगिरी करूनही जलाजला भारतीय संघात संधी मिळाली नाही.